# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 09/12/2019 (सोमवार)
# (सकाळ)

---

## मोबाईल चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 5 कि. मी. अंतरावर मौजा वार्ड क्र, 3, सेलु येथे दिनांक 08/12/2019 चे 07:30 वा. ते 09:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अभिनय भोजराज गायकवाड, वय 30 वर्ष, रा. सेलु, वार्ड क्र. 3 यांनी त्यांचा ॲपल कंपनीचा मोबाइल घराचे उघडया जागेत टेबलावर चार्जिंगला लावुन ठेवले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या उघडया दारातुन प्रवेश करून ॲपल कंपनीचा मोबाइल कि. 24,890/–रू. चा चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ मोरेश्वर नागपूर हे करीत आहे.

## जबर दुखापत

1) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 03 कि. मी. अंतरावर जैयस्वाल बियर बार समोर टाकळघाट येथे दिनांक 07/12/2019 चे 20:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रफुल मनिराम खेडकर, वय 28 वर्ष, रा. टाकळघाट, वार्ड क्र. 01 हा जैस्वाल बियर बार टाकळघाट जवळुन जात होता. दरम्यान एका अनोळखी आरोपीने फिर्यादीला 10 रु. मागितले असता फिर्यादीने म्हटले की, ''माझ्या जवळ पैसे नाही'' या कारणावरून इतर दोन आरोपीतांनी फिर्यादीस पकडुन ठेवले व पैसे मागितलेल्या आरोपीने चाकुने जखमीचे गळयावर, कपाळावर, डाव्या गालावर व डोक्यावर मारहाण करून गंभीर दुखापत केली. तपासा दरम्यान आरोपी नामे– नवनीत बापुराव डाफरवार, वय 26 वर्ष, रा. टाकळघाट यास अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम 326, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रमोद बन्सोड 9673608642 हे करीत आहे.

2) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 06 कि. मी. अंतरावर मौजा बेलोना येथे दिनांक 08/12/2019 चे 07:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. मनिषा संजय खंडारे, वय 38 वर्ष, रा. बेलोना यांना आरोपी नामे– 1) कमलेश प्रकाश वासनिक व 2) प्रदीप प्रकाश वासनिक, दोन्ही रा. बेलोना या दोघांनी नालीत कचरा टाकु नका. या कारणावरून आरोपीतांनी फिर्यादीसोबत भांडण केले. तसेच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी व तिच्या पतीस शिवीगाळ करून फिर्यादीच्या तोंडावर हातबुक्याने मारहाण केल्याने त्यांचा एक दात पाडुन गंभीर दुखापत केली. तसेच फिर्यादीच्या पतीला सुध्दा आरोपीतांनी मारहाण करून पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 325, 323, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक साहेबराव मसराम हे करीत आहे.

## विनयभंग

1) पो.स्टे. काटोल :– दि. 07/12/2019 चे 23:00 वा. ते 23:30 वा. चे सुमारास 23 वर्षीय पीडित/फिर्यादी हिचे पती भजनाकरीता गेले असता ती आतल्या खोलीत दोन्ही मुलांना घेवुन झोपली होती. दरम्यान आरोपी नामे– रोशन चारणदास गजभिये, वय 30 वर्ष, रा. आंबेडकर चौक, बोरी ता. काटोल याने पीडितेच्या घरात प्रवेश करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 354, 451 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसतोनि वानखेडे या करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– दि. 08/12/2019 चे 15:30 वा. ते 15:45 वा. चे सुमारास 28 वर्षीय पीडित/फिर्यादी हिने आरोपी नामे– विजय भागवत ठाकरे, वय 34 वर्ष, रा. शिक्षक कॉलनी, कळमेश्वर याच्या दुकानातुन जाऊन शॅम्पु मागितला असता आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि अश्विनी बावचे या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर